पुणे दिनांक - ८/७/२०१९

## प्रेस नोट

### गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाकडुन शहर भिक्षेकरीमुक्त करण्याचा इरादा

मा. श्री.अशोक मोराळे सो, अपर पोलीस आयुक्त गुन्हे, मा. श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे पुणे शहर, मा. श्री.भानुप्रताप बर्गे, सहा पोलीस आयुक्त गुन्हे २ पुणे यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाच्या पोलीस निरीक्षक (अतिरीक्त कार्यभार) शिल्पा चव्हाण यांच्या सहा.पो.फौज.झांजरे, पो.हवा.देशमुख, पो.हवा.आटोळे, म.पो.हवा.स्वामी,पो.ना.जाधव,पो.ना.वंजारी चालक सहा.पो. फौज.शेडगे यांनी पुणे शहरातील मुख्य चौकांमध्ये सिग्नलला उभे राहुन येणारे जाणारे वाहनचालक व नागरिकांकडे भिक्षा मागुन त्यांना उपद्रव करणारे भिक्षेक-यांवर कारवाई करणेत आली .

पोलीस निरीक्षक शिल्पा चव्हाण व त्यांचे पथक डेक्कन पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रात दिनांक ३/७/२०१९ रोजी पेट्रोलिंग फिरत असताना संभाजी उदयान समोर दोन महिला व दोन पुरुष असे येणारे जाणारे वाहन चालकांकडुन व नागरिकांकडुन भीक मागताना आढळुन आले. त्यांना लागलीच वरील पथकाने ताब्यात घेतले व त्यांचेवर भिक्षा प्रतिबंधक अधिनियम कलम ४ (१) प्रमाणे कारवाई करुन भीक मागणा-या एकुण ०४ भिक्षे-यांना पुढील कार्यवाहीस्तव डेक्कन पोलीस स्टेशनचे ताब्यात दिले.

तसेच पोलीस निरीक्षक शिल्पा चव्हाण वरील पथकासह लष्कर पोलीस स्टेशन भागात दिनांक ६/७/२०१९ रोजी पेट्रोलिंग फिरत असताना हनुमान मंदीराशेजारी सेंटर स्ट्रीट चौक कॅम्प पुणे येथे दोन पुरुष भिक्षेकरी येणारे जाणारे लोकांकडुन भीक मागताना आढळुन आलेने त्यांचेवर भिक्षा प्रतिबंधक अधिनियम कलम ४ (१) प्रमाणे कारवाई करुन त्यांना पुढील काय्रवाहीस्तव लष्कर पोलीस स्टेशनचे ताब्यात दिले आहे.